# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ०४/१२/२०२४ अनु.क्र.२२०

**(अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)**

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.**
- **महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.**
- **जातीयसलोखा वाढविणे.**
- **संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.**
- **" सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.**

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/आस्था-१/मुदतपुर्व बदली/८८०८/२०२४ अमरावती शहर दिनांक ०७/१०/२०२४**

**संदर्भ** :-१) पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक :- पोमसं/३/अधिसूचना/ १४/ २०१४/७३ दिनांक २५/०२/२०१५
२) महाराष्ट्रपोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश क्रमांक २, दिनांक १६/०२/२०१५
३) महाराष्ट्र शासन गृहविभाग, शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र ३११५/प्र.क्र.८८/पोल-३, दिनांक ०१ जुलै २०१५
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.२९/कार्या.१२ दि.२७.५.२०२२

## आदेश

उपरोक्त संदर्भात नमुद केल्या प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश-२०१५, मधील कलम २२ न च्या तरतुदीनुसार पोलीस आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन खालीलनमुदपोलीस अंमलदार यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविल्या प्रमाणे संदर्भाधीन आदेशान्वये करण्यात आलेल्या बदलीच्या ठिकाणा मध्ये **अशंत:बदल** करण्यातयेतआहे.

| अ.क्र | पदनाम | ब.क्र. | पोलीसअंमलदाराचे नाव | कोठुन | कोठे |
|---|---|---|---|---|---|
| 1. | पोशि | 336 | रामकृष्ण प्रकाश कांगडे | पो.स्टे.फ्रेजरपुरा | गुन्हे शाखा |

## रजा

**१.पोआअ/पशा-१/सेवानिवृत्ती पुर्व रजा/पोउपनि-इसोकार/९८७७/२०२४ अमरावती शहर दिनांक १९/११/२०२४**

## आदेश

अमरावती शहर या पोलीस घटकातील खालील नमुद पोलीस अधिकारी सेवानिवृत्त होत असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ उपकलम ६६ (१) अन्वये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत सेवानिवृत्तीपुर्व रजा मंजुरकरण्यात येत असुन त्यांचे खाती जमा असलेल्या अर्धवेतनी रजेमधुन त्यांना मंजूर करण्यात आलेल्या रजेच्या दुप्पट रजाखर्ची घालण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुकीचे ठिकाण | रजा मंजुरीचा प्रकार | रजा मंजुरीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. नितीन गंगाधर इसोकार, पोलीस उपनिरीक्षक, | विशेष शाखा | सेवानिवृत्ती पुर्व रजा | दि. २६/११/२०२४ ते दि. २५/१२/२०२४ (एकुण३० दिवस) |

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअश/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोउपनि-जाधव+१/१०२१७/२०२४ अमरावती दिनांक २८/११/२०२४**

**संदर्भ क्रमांक:-** या कार्यालयाचीकारणे दाखवा नोटीसक्रमांक पोआअश/विचौ-२/कसुरी/नाईट पेट्रोलींग/ का.दा.नो./ पोउपनि-जाधव + १/६९३७/२०२४, दिनांक ०१/०८/२०२४

**कसुरदारचे नाव :-** १) श्री अजय जाधव, पोलीस उपनिरीक्षक, नेमणुकतत्का.पो.स्टे.सिटी कोतवाली (सध्या नेमणुक जलद प्रतिसाद पथक), अम.शहर, २) पोहवा/२८८ संतोष चव्हाण, नेमणुक पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अम.शहर.

**थोडक्यातकसुरी :-**

तुम्ही खालील नमुद पोलीस अधिकारी/अंमलदारतुमचीपोलीस आयुक्तालय, अमरावती शहर अंतर्गत पोलीस स्टेशन सिटी कोतवाली हद्दीत नाईट पेट्रोलींग म्हणुन तुमचे कर्तव्य नेमण्यात आले होते. तरी तुम्हाला नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थित पार न पाडता तुम्ही तुमच्या नावासमोर दर्शविल्या प्रमाणे तुम्ही पोलीस स्टेशन ला हॉल्ट केल्याचे निदर्शनास आले आहे. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदार पणाचे दिसुन आले असुन तुम्हाला नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता पोलीस स्टेशन ला हॉल्ट केला असुन तुम्हाला वरिष्ठाने दिलेल्या सुचनां कडे दुर्लक्ष केले असुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

| **अ.क्र** | **पो.अधि.अंम.यांचे नाव, हुद्दा व ब.नं.** | **नेमणुक ठिकाण** | **कर्तव्य दिनांक** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १ | श्री अजय जाधव, पोउपनि | तत्का.पो.स्टे. सिटी कोतवाली (सध्या नेमणुक जलद प्रतिसाद पथक), अम.शहर | २३/०७/२०२४ चे रात्री १२.०० वा. ते २४/०७/२०२४ सकाळी ०५.०० वा. पर्यत | पो.स्टे.ला ०४ वा. पासुन हॉल्ट राहिले |
| २ | पोहवा/२८८ संतोष चव्हाण | पो.स्टे. सिटी कोतवाली | २३/०७/२०२४ चे रात्री १२.०० वा. ते २४/०७/२०२४ सकाळी ०५.०० वा. पर्यत | पो.स्टे.ला ०४ वा. पासुन हॉल्ट राहिले |

अशा प्रकारेतुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त)** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदरकारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर न केल्याने पुन्हा पत्र क्र. ९१३८/२०२४, दिनांक १७/१०/२०२४ अन्वये कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर करणे करीता पत्राव्दारे संधी देण्यात आल्या नंतर तुम्ही सादर केलेल्या स्पष्टीकरण्याचे अवलोकन केले असता सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्तीक व

समाधानकारक न वाटल्याने कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये दिलेली शिक्षाकायम ठेवुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## **अंतिम आदेश**

वर नमुद कसुरदार यांना उपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेनेकसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

## **भाग-३**

## **वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण**

## **वेतन निश्चिती**

**१. पोआअ/आस्था-वेनिलि/वि.वेतन/बीडीडीएस/१०२२१/२०२४ अमरावती शहर दिनांक २८/११/२०२४**

## **आदेश**

खालील नमूद पोलीस अंमलदार यांची त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास बॉम्ब शोधक व नाशक पथक अमरावती शहर येथे नेमणुक करण्यात आली असुन त्यांनी महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी येथील घातपात विरोधी तपासणी (बेसिक) प्रशिक्षण नमूद दिनांकास यशस्वीरीत्या पुर्ण केले आहे.

| अ. क्र. | नाव,पदनाम,ब.क्र. | नेमणूक | बीडीडीएस पथकातील नेमणूकीचा दिनांक | बीडीडीएस बेसीक प्रशिक्षण पुर्ण केल्याचा दिनांक | प्रोत्साहन (जोखीम)भत्ता अनुज्ञेयतेचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोशि/१६०६,अजय तायडे | बॉम्ब शोध व नाशक पथक | दि.११.०८.२०२४ | दि.०४.१०.२०२४ | दि.०४.१०.२०२४ |

शासन निर्णय गृह विभाग शासन निर्णय क्र.एसएसए-०११९/प्र.क्र.२१/विशा-४/ दि. ०५ सप्टेबर २०२२ मधील तरतुदीनुसार बॉम्ब शोध व नाशक पथकातील कार्यरत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार (घरभाडे भत्ता व पुरक भत्ते वगळता) मूळ वेतनाच्या २५% व सशस्त्र पोलीस शिपाई (मोटार वाहन चालक) यांना सातव्या वेतन आयोगानुसार(घरभाडे भत्ता व पुरक भत्ते वगळता) मूळ वेतनाच्या १५% प्रोत्साहन (जोखीम) भत्ता मंजूर करण्यात आला आहे.

**त्याअनुषंगाने उपरोक्त नमूद पोलीस अंमलदार यांनी महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी येथील घातपात विरोधी तपासणी (बेसिक) प्रशिक्षण दि.२०.०९.२०२४ ते ०४.१०.२०२४ या कालावधीत यशस्वीरित्या पुर्ण केले असल्याने प्रशिक्षण पुर्ण केल्याचे दिनांका पासुन (०४.१०.२०२४)** त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार (घरभाडे भत्ता व पुरक भत्ते वगळता) मूळ वेतनाच्या २५% प्रोत्साहन (जोखीम) भत्ता अदा मंजुर करण्यात येत आहे.

सदरचा प्रोत्साहन भत्ता अदा करणे बाबत खालील प्रमाणे सूत्राचा वापर करण्यात यावा.

| | |
|---|---|
| बॉम्ब शोध व नाशक पथकातील कार्यरत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबत अवलंबिण्याचे सूत्र | सातव्या वेतन आयोगानुसार मिळणारे मूळ वेतन x ०.२५ = सातव्या वेतन आयोगामधील प्रोत्साहन भत्ता. |

प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च २०५५-पोलीस-१०९-जिल्हा पोलीस (००) (००) जिल्हा पोलीस दल (२०५५०१६८) ०१ वेतन या लेखा शिर्षाखाली मंजुर व उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा. सदरच्या वेतन निश्चिती मुळे अनुज्ञेय असणारी थकबाकी रोख स्वरुपात वेतनात अदा करण्यात यावी.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस